# श्री. छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल, जळगांव बाबतची माहीती

महाराष्ट्र शासनाच्या सन २००१ च्या क्रीडा धोरणानुसार आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार करण्यासाठी महाराष्ट्रात प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी विविध खेळांच्या सोई सुविधासह जिल्हा क्रीडा संकुले उभारावयाची आहेत. जळगांव जिल्हयाच्या जिल्हा क्रीडा संकुलाचे बांधकाम जळगांव या ठिकाणी जिल्हा क्रीडा संकुल समिती मार्फत करण्यांत आलेले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जिल्हा क्रीडा संकुल स्थळ व जमिन | : | श्री. छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल, जिल्हा पेठ, जळगांव. सिटी सर्वे नंबर १९७७ क्षेत्रफळ-३३७८४.०५ चौरस मिटर, जळगांव नगर पालिका यांचेकडून दि.२६/५/२००४ रोजी समितीकडे वर्ग |
| २. | क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कडून प्रशासकीय मान्यता. | : | दि. २६/०५/२००४ च्या आदेशानुसार रू. ६,९७,४७,६९२/- च्या आराखडे व अंदाजपत्रकास मान्यता. त्यानुसार शासनाकडून रू. ४.०० कोटी प्राप्त झाले असून उर्वरित रक्कम ११४ व्यापारी गाळे/कार्यालये यांचे अनामत रकमेतून जिल्हा क्रीडा संकुल समितीने उभी केलेली आहे. |
| ३. | भूमिपूजन | : | दि. २०/८/२००४ रोजी श्री. अरूण भाई गुजराथी तत्कालीन अध्यक्ष, महाराष्ट्र विधान सभा यांच्या अध्यक्षतेखाली व श्री.सुरेशदादा जैन, तत्कालीन अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा पालक मंत्री, जळगांव यांचे हस्ते |
| ४. | बांधकामास सुरूवात | : | जळगांव महानगरपालिकचे परवानगी पत्र क्र.६५५ दि.२९/६/२००४ अन्वये दि.२५/९/२००४ रोजी श्री.भवरलालजी जैन यांच्या शुभ हस्ते. |
| ५. | वास्तुविशारद (आर्कीटेक्ट) | : | श्री.शिरीष बर्वे, एम.जे.कॉलेज जवळ, जळगांव, फोन. २२३५८०७ |
| ६. | ठेकेदार (कॉन्ट्रक्टर) | : | मे ई.सि.पी.हाऊसिंग (इं) प्रा.लि.जळगांव, |
| ७. | शासनाकडून प्राप्त अनुदान व प्रत्यक्ष खर्च | : | महाराष्ट्र शासनाकडून रुपये चार कोटी प्राप्त. रुपये १०.५० कोटी प्रत्यक्ष खर्च. |

# श्री. छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुलात खालील सोई सुविधा उपलब्ध आहेत

| | | | |
|---|---|---|---|
| १. | खुले प्रेक्षागृह | : | १०,००० प्रेक्षकांची बैठक व्यवस्था |
| २. | ४०० मीटर धावन मार्ग (ट्रॅक) | : | ८ लेन सह ४०० मीटरचा रनिंग ट्रॅक, उंच उडी, लांब उडी, बांबू उडी, ट्रिपल जंप, जंपीगपीट, गोळा फेक, थाळी फेक, भाला फेक, हॅमर थ्रो ची मैदाने, तसेच टर्फचे फुटबॉल, हॉकी व क्रीकेट मैदान. |
| ३. | इनडोअर हॉल | : | इनडोअर हॉल ॲकॉस्टीक्स भिंती व प्रेक्षक गॅलरीसह. आंतरराष्ट्रीय दर्जाचे ४ बॅडमिंटन वुडन कोर्ट, व जिम्नॅस्टिक्स् खेळाची सुविधा तसेच स्वतंत्र योगा, अद्यावत व्यायाम शाळा, बुध्दीबळ खेळासाठी व अरोबिक्ससाठी हॉल. |
| ४. | क्रीडा वसतीगृह | : | इनडोअर हॉलमध्येच १५० मुले/मुली खेळाडूंसाठी सेल्फ कंटेन्डेड रूम्स् सह निवास व्यवस्था, खेळाडूंसाठी डायनिंग हॉल, स्वतंत्र किचन, खेळाडूंसाठी लिफ्ट व्यवस्था, मेंबर्ससाठी हॉल व पार्कींग सुविधा. |
| ५. | विविध खेळांची स्वतंत्र्य क्रीडांगणे | : | एक स्क्वॅश कोर्ट, दोन कब्बड्डी मैदाने, दोन खो-खो मैदाने, दोन व्हॉलीबॉल मैदाने, एक बास्केट बॉल मैदान, एक लॉन टेनिस कोर्ट. |
| ६. | जलतरण तलाव | : | फिल्टरेशन प्लँट व प्रेक्षक गॅलरीसह सेमी ऑलिंपीक साईजचा २५ मी. x २१ मी. चा जलतरण तलाव स्वतंत्र चेजींग रूम्स् सह. |
| ७. | व्यापारी गाळे व कार्यालयांच्या साठी खोल्या | : | रेल्वे स्टेशन कडून स्टँड कडे जाणा-या रोड लगत व लेवा बोर्डीग कडून रिंग रोड कडे जाणा-या रोड लगत लोअर |

ग्राउंड फ्लोअर ५२, अप्पर ग्राउंड फ्लोअर ४२ मिळून एकूण ९४ व्यापारी गाळे दुकांनासाठी व कार्यालयासाठी (ऑफीसेस साठी) २० खोल्या. सदरची दुकाने व खोल्या विंग ए , विंग बी, विंग सी, विंग डी अशी अर्ध वर्तुळाकार रचनेत असून त्या पूर्ण झालेल्या आहेत. त्यांचे क्षेत्रफळ २१० पासुन ३६० चौ.फुटापर्यंत आहे. सर्व दुकाने/खोल्या २८ वर्षांच्या दिर्घ मुदतीच्या कराराने देण्यास सुरूवात करण्यांत आलेली आहे.

८. **इतर सुविधा** : अत्याधुनिक स्वागत कक्ष, प्रथमोपचार केंद्र, अग्निशामन व्यवस्था, पोलिस स्टेशन, टेलिफोन बुथ, क्रीडांगणावर फ्लड लाईट व्यवस्था